


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com

https://epaper.vidarbhaprajasattak.com

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ७७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १४ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## बाबासाहेब जिवंत होते तोवर काँग्रेसने मुस्लीम अध्यक्ष का बनवला नाही? - पंतप्रधान मोदी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४हिसार अयोध्या**

काँग्रेस बाबासाहेबांसोबत कशी वागली, हे आपण विसरायला नको. बाबासाहेब जोपर्यंत जिवंत होते, काँग्रेसने त्यांचा अपमान केला. त्यांना दोन वेळा निवडणुकीत पराभूत केले. काँग्रेसने त्यांच्या स्मृती पुसून टाकण्याचाही प्रयत्न केला. काँग्रेसने बाबासाहेबांचे विचार नष्ट करण्याचाही प्रयत्न केला. डॉ बाबासाहेब अंबेडकर हे संविधानाचे रक्षक होते, मात्र काँग्रेस संविधानची भक्षक बनली आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. त्यांनी सोमवारी (१४ एप्रिल) हिसार ते अयोध्येसाठी व्यावसायिक विमानसेवेला हिरवा झेंडा दाखवला आणि हिसारमधील महाराजा अग्रसेन विमानतळाच्या नव्या टर्मिनल इमारतीची पायाभरणी केली. या दरम्यान ते बोलत होते.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, काँग्रेस देशातील अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांना दुय्यम दर्जाचे नागरिक मानले. काँग्रेस नेते स्विमिंग पूलसारख्या सुख-सुविधांचा आनंद घेत होते. मात्र, गावांतील प्रति १०० घरांमागे केवळ १६ घरांनाच पाईपने पाणीपुरवठा होत होता. याचे सर्वाधिक नुकसान एससी, एसटी आणि इतर मागासवर्गीयांनाच झाले. आज जे गल्लया-गल्लयांत जाऊन भाषणे देत फिरत आहेत. त्यांनी किमान आपल्या अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय बांधवांच्या घरी पाणी तरी पोहोचवायला हवे होते.



पंतप्रधान मोदी यांनी वक्फ कायद्यावरून काँग्रेसवर थेट निशाणा साधला. ते म्हणाले, काँग्रेसने केवळ काही कट्टरपंथीयांनाच खूश केले. उर्वरित समाज दयनीय, अशिक्षित आणि गरीब राहिला. काँग्रेसच्या या वाईट धोरणाचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे वक्फ कायदा. एवढेच नाही तर, काँग्रेस एखाद्या मुस्लीम नेत्याला अध्यक्ष का बनवत नाही? असा सवालही पंतप्रधान मोदींनी काँग्रेसला केला.

मोदी म्हणाले, कर्नाटक सरकारने अनुसूचित जाती, जमाती आणि मागास वर्गाचे अधिकार काढून घेत धर्माच्या आधारावर आरक्षण दिले. मात्र, धर्माच्या आधारावर आरक्षण दिले जाणार नाही, असे बाबा साहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केले होते. काँग्रेसच्या लांगुल चालनाच्या राजकारणाने मुस्लीम समाजाची मदत नव्हे, तर नुकसानच केले आहे.

**वक्फ बिल योग्य असते तर मुस्लिम आज पंक्चर काढत बसला नसता**

वक्फ विधेयकावरून पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार उफाळलेला असताना, देशभरात मुस्लिम संघटनांकडून विरोध होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पहिल्यांदाच वक्फ विधेयकाच्या कायद्यात रुपांतर झाल्यावर वक्तव्य आले आहे. मोदी यांनी आज हरियाणाच्या हिसार ते अयोध्या विमानसेवेचे उद्घाटन केले. यावेळी विमानतळावरच मोदी यांनी सभा घेतली.

देश स्वतंत्र झाल्यापासून २०१३ पर्यंत वक्फ कायदा चालत होता. निवडणुकीत मते मिळावीत म्हणून २०१३ मध्ये काँग्रेसने त्यात बदल केला. कायदा असा बनविला की बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाची पुरती वाट लावली. याचा योग्य वापर केला असता तर आज मुस्लिमांना सायकलच्या टायरच पंक्चर काढायची गरज राहिली नसती, असे मोदी म्हणाले.

ते त्यांनी मुस्लिमांच्या हितासाठी केल्याचे काँग्रेस सांगत आहे. जर एवढीच काँग्रेसला खऱ्या मुस्लिमांबाबत आत्मियता आहे तर त्यांनी एका मुस्लिम व्यक्तीला काँग्रेस अध्यक्ष बनवावे. पण यांचे नेते ते करणार नाहीत. या लोकांना फक्त देशाच्या नागरिकांचे अधिकार हिसकावून घ्यायचे आहेत, असे मोदी म्हणाले. काँग्रेसने आपल्या पवित्र संविधानाला सत्ता मिळवण्यासाठी एक शस्त्र बनवले आहे. जेव्हा जेव्हा काँग्रेसवर सत्तेचे संकट आले तेव्हा त्यांनी संविधान चिरडले आहे. संविधानाचा आत्मा असा आहे की प्रत्येकासाठी समान नागरी संहिता असावी, ज्याला मी समान नागरी संहिता (UCC) म्हणतो, परंतु काँग्रेसने ते लागू केले नाही. उत्तराखंडमध्ये भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर, णउउ मोठ्या आनंदाने लागू करण्यात आला. संविधान खिशात घेऊन बसलेले काँग्रेसचे लोक त्याचा विरोध करत आहेत, असा आरोप मोदी यांनी केला.

## म्यानमारला जाणारे भारताचे विमान हवेत असताना अज्ञातांकडून सायबर हल्ला

### पायलटची समयसूचकता अन् मोठा अनर्थ टळला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

भारताच्या शेजारील देश म्यानमार भूकंपाने हादरला आहे. या भूकंपामुळे हजारो लोक मृत्यूमुखी पडले असून अब्जावधी रुपयांची वित्तहानी झाली आहे. शेकडो घरं, इमारती कोसळल्या असून, हजारो लोक बेघर झाले आहेत. भूकंपग्रस्त भागात अन्नधान्याचा व वैद्यकीय सेवेचा तुटवडा आहे. त्यामुळे जगभरातून म्यानमारकडे मदतीचा ओघ सुरू झाला आहे. भारतानेही मदतीचा हात पुढे केला आहे. दरम्यान, भारतातून म्यानमारला मदत सामग्री घेऊन जाणाऱ्या विमानावर सायबर हल्ला झाल्याचं वृत्त समोर आलं आहे.



भारताच्या संरक्षण दलातील सूत्रांनी इंडिया टूडेला सांगितलं की भारतीय हवाई दलाचं विमान सी-१३० मदत सामग्री घेऊन म्यानमारला जात होतं. त्याचवेळी या विमानावर जीपीएस स्पूफिंग हल्ला झाला. हल्लेखोरांनी या विमानाची नेव्हिगेशन प्रणाली हॅक करण्याचा (स्वतःच्या नियंत्रणात घेण्याचा किंवा विस्कळीत करण्याचा) प्रयत्न केला. हल्लयाची जाणीव होताच त्या विमानाच्या वैमानिकाने ताबडतोब अंतर्गत नेव्हिगेशन प्रणालीवर स्विच केलं. वैमानिकाच्या शहाणपणामुळे मोठी दुर्घटना टळली.

## वाल्मीक कराडचा एन्काऊंटर करण्याची ऑफर निलंबित पोलीस अधिकाऱ्याचा खळबळजनक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४बीड**

बीड - मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर होती असा दावा निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यांनी केला आहे. रणजीत कासले हे बीडच्या सायबर विभागात पोलीस निरीक्षक होते. मागील काळात त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. त्यानंतर कासले यांनी अनेक दावे त्यांच्या सोशल मीडियाच्या माध्यमातून केले आहेत. त्यात वाल्मीक कराडच्या एन्काऊंटच्या दाव्यामुळे खळबळ उडाली आहे.

रणजीत कासले यांनी व्हिडिओ पोस्ट करत म्हटलंय की, मी अक्षय शिंदे याच्या एन्काऊंटरची बातमी पाहिली. या ५ पोलिसांवर गुन्हे दाखल करा आणि एसआयटी बसवा असं कोर्टाने म्हटलं. एसआयटी बसवून काही उपयोग होणार नाही. जर चौकशी करायची असेलच तर केंद्राची यंत्रणा बसवा, मग त्यातून सत्य बाहेर पडेल. फेक एन्काऊंटर कसे होतात हे मी सांगतो. ज्यावेळी मला वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर दिली होती पण मी नकार दिला. एन्काऊंटरसाठी मोठी रक्कम ऑफर दिली जाते, १०, २०,



५० कोटी इतके दिले जातात. तुम्ही बोलाल तेवढे पैसे देतात. मी सायबर शाखेत होतो, पण मी हे करू शकतो हे माहिती असल्याने त्यांनी मला ऑफर दिली होती असं त्यांनी सांगितले.

तसेच मी मोठेपणा सांगत नाही. परंतु फेक एन्काऊंटर करताना ४ लोकांची टीम असते, त्यात मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, गृह सचिवांची गुप्त बैठक होते. त्यात काय करायचे हे ठरते. मग त्यानंतर ५-६ विश्वासू लोकांची टीम बनते. ती संबंधित ठिकाणी जाते, म्हणजे अक्षय शिंदे याचे झाले तसे, तिथे १ अधिकारी, २-३ अंमलदार अशी आणखी एक टीम तयार केली जाते. त्यांना ५,१०, १५ कोटी मोठी रक्कम एकाच वेळी दिली जाते. त्यानंतर या घटनेची चौकशी आपलेच सरकार करेल, त्यातून तुम्हाला मुक्त करू अशी वचने दिली जातात अशाप्रकारे बोगस एन्काऊंटर घडवून आणले जातात हा दावा निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यांनी केला.दरम्यान, आरोपीच्या हातात बेड्या असतात. त्याशिवाय दोरखंडाने हात-पाय बांधलेले असतात. अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर किती बोगस होता असंही रणजीत कासले यांनी सांगितले. बीड पोलीस दलात रणजीत कासले कार्यरत होते. त्यांचे निलंबन झालं असून त्यानंतर ते अनेक व्हिडिओ सोशल मीडियात टाकत असतात. त्यातच वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर होती हा दावा केल्यानं बीड जिल्ह्यात प्रशासनात खळबळ उडाली आहे. फक्त वाल्मीक कराड नव्हे तर इतर आरोपींचा फेक एन्काऊंटर कसा केला जातो हेदेखील कासले यांनी व्हिडिओ पोस्ट करत गंभीर दावा केला आहे.

## देवेंद्र विरुद्ध फुले, आंबेडकर अशा प्रकारचा वाद त्यांच्या मनात; पाटलांचे राऊतांना प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४पुणे**

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र प्रतिगामी शक्तींच्या विळख्यात सापडला. 'फुले' चित्रपटास त्यातूनच विरोध सुरू आहे. महाराष्ट्रात 'फुले-आंबेडकर विरुद्ध फडणवीस' असा हा झगडा आहे! मुख्यमंत्री फडणवीस या सामाजिक विषयावर गप्प का बसले आहेत? त्यांनी मौन सोडावे. नाहीतर हा झगडा 'फुले विरुद्ध फडणवीस' असाच आहे यावर शिक्का बसेल अशी टीका संजय राऊत यांनी सामनाच्या अग्रलेखातून केली आहे.



पाटील म्हणाले, संजय राऊत जे बोलतील ते खरं न मानता ते खोट आहे असंच म्हणावं लागतं. महाराष्ट्रामध्ये भारतीय जनता पार्टीला १६७ जागा मिळाल्या सहयोगी पक्ष म्हणून महायुतीला २३५ जागा मिळाल्या. आणि या आमदारांनी देवेंद्रजी ना मुख्यमंत्री बनवले. या देवेंद्रजींनी २०१४ ते २०१९ आरक्षणाची सुविधा या एकमेकात अडकल्या होत्या त्या वेगळ्या केल्या.

## मी पक्षासाठी लाठ्या खाल्ल्या, हा नंतर आला अन् येऊन काड्या करतो; खैरेंनी घेतला दानवेंचा समाचार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४संभाजी नगर**

लोकसभा निवडणुकीपासूनच ठाकरे गटाचे नेते आणि माजी खासदार चंद्रकांत खैरे आणि अंबादास दानवे यांच्यामध्ये सातत्याने आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. आता पुन्हा एकदा दानवे आणि खैरेंमधला वाद विकोपाला गेलाय. अंबादास मोठा झाल्यासारखा वागतोय. शिवसेना मी वाढवली, हा नंतर आला आणि काड्या करण्याचं काम करतो, असा घणाघात खैरेंनी केलाय.

चंद्रकात खैरे यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केलं. अंबादास दानवे यांनी बोलावलेल्या पक्षाच्या मेळाव्याला खैरेंनी यांनी दांडी मारली होती. याविषयी विचारले असता खैरे म्हणाले की, कालच्या पक्षाच्या कार्यक्रमाबाबत मला कुणी सांगितलं नव्हतं. या मेळाव्याबाबत अंबादासनेही मला काहीही सांगितलं नाही. आता तो स्वत:ला मोठा समजतो. तुम्ही काय आम्हाला कचरा समजता का? मी उद्धव साहेबांना याबद्दल सांगणार आहे, तक्रार करणार आहे. अंबादास मोठा झाल्यासारखा वागतोय. मी सुरूवातीपासूनच शिवसेनेचा नेता आहे. शिवसेना मी वाढवली, लाठ्या काठ्या खाल्या. जेलमध्ये गेलो हा नंतर आला आणि काड्या करण्याचं काम करतोय, असं खैरे म्हणाले.



पुढं बोलताना म्हणाले, काड्या करणं मला आवडत नाही. आणि मला कुणीही काढूही शकत नाही. माझ्या पक्षासाठी मी काहीही करेल. मी माझं आंदोलन करणार, माझं आंदोलन माझ्या पक्षाचं आंदोलन असेल. तो करेल नाही तर नाही करेल, मला माहिती नाही. अंबादास दानवेमुळं शिवसेनेतील अनेक लोक फुटले, या माणसाने काय केलं सांगा. अनेक लोक सोडून जात आहेत, असंही खैरे म्हणाले.

## घरात घुसून मारू; गाडी बॉम्बनं उडवून देऊ; 'भाईजान' सलमानला पुन्हा जीवे मारण्याची धमकी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

बॉलीवूड अभिनेता सलमान खानला पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. युमळे मोठी खळबळ उडाली असून, यावेळी सलमानला देण्यात आलेल्या धमकीत घरात घुसून आणि गाडी बॉम्बनं उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. मुंबईच्या वरळी येथील वाहतूक विभागाच्या व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवलेल्या संदेशाद्वारे ही धमकी देण्यात आली आहे. या घटनेनंतर, वरळी पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून. ही धकमी नेकमी कुणी दिली यामागे कुणाचा हात आहे याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. ही धमकी लॉरेन्स बिश्नोईकडून आली आहे की नाही हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.



सलमान खानला जीवे मारण्याची धमकी मिळण्याची ही पहिलीच वेळ नाहीये. या अभिनेत्याला यापूर्वीही अशाच प्रकारच्या धमक्या अनेकदा मिळाल्या आहेत. मध्यंतरी सलमान खानला बिश्नोई गँगकडून सातत्याने जीवे मारण्याची धमकी दिली जात आहे. याच पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी सलमान खानने सुरक्षा व्यवस्था लक्षात घेऊन गॅलेक्सी अपार्टमेंटच्या बाल्कनीमध्ये बदल केले. सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर सलमानच्या गॅलक्सी अपार्टमेंटला बुलेटप्रुफ काच लावल्या आहेत. सलमानच्या वांद्रे येथील गॅलक्सी अपार्टमेंट बाहेर २०२४ च्या एप्रिल महिन्यामध्ये गोळीबार झाला होता. त्यानंतर सलमान खानची सुरक्षा वाढवली. गॅलक्सी अपार्टमेंटला तगडा बंदोबस्त करण्यात येतोय.

## आंबेडकर हेच खरे राष्ट्रपुरुष होते- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

देशाच्या विकासात संविधानाचा मोलाचा वाटा आहे. आज एकसंघ भारत आपण बघतो आहे याचं श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानाला जातं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हंटलं आहे. आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी होते आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसोबत चैत्यभूमीवर भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केलं. यानंतर आयोजित कार्यक्रमात उपस्थित राहून त्यांनी उपस्थितांसमोर भाषण केलं. त्यावेळी ते बोलत होते.



पुढे बोलताना फडणवीस म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच खरे राष्ट्रपुरुष होते. त्यांनी कधी स्वतःचा विचार केला नाही. त्यांचे कार्य अतुलनीय होते. देशाच्या विकासात संविधानाच मोलाचा वाटा आहे. संविधानामुळेच प्रत्येकाला समान अधिकार मिळाला असल्याचं देखील फडणवीस यांनी म्हंटलं.

## संपादकीय ......

# डॉ. आंबेडकर : द्रष्टे कृषी अर्थतज्ज्ञ

महामानव डॉ. आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात, मात्र त्यांचे विचार केवळ सामाजिक न्यायापुरते नव्हते. त्यांनी अर्थव्यवस्था, शेती, कामगार हक्क, पाणी व्यवस्थापन आणि औद्योगिक धोरण यांसारख्या क्षेत्रांतही महत्त्वपूर्ण मते मांडली. विशेषतः कृषी आणि ग्रामीण भारताबद्दल त्यांनी केलेले चिंतन आजही सुसंगत आणि मार्गदर्शक ठरते. आपण आपला देश शेतीप्रधान असल्याचे अभिमानाने सांगत असतो, पण औद्योगिक क्रांती होण्यापूर्वी सारे जगच कृषिप्रधान होते. कारण माणसाच्या सर्व गरजा शेतावरच भागत होत्या. गरजा वाढत जातात तशा त्या भागवण्यासाठी कारखाने काढावे लागतात. ते काढले की, त्या त्या देशातील लोक शेती सोडून कारखान्यात कामे करू लागतात. शेतीवरचा भार कमी होतो. कारखाने निघण्यापूर्वी देशाची अन्नाची गरज भागवण्यासाठी ७० ते ८० टक्के लोक शेतीत काम करीत असतात, पण कारखाने निघाले की शेतीवर काम करणार्यांची टक्केवारी कमी होत जाते. भारतात तसे झाले नाही. आहे ती लोकसंख्या शेतीतच काम करीत राहिली. लोकसंख्या वाढत गेली तरी जमिनीचे क्षेत्रफळ काही वाढत नाही. म्हणजे वाढत चाललेली लोकसंख्या त्याच जमिनीवर राबत राहते. आहे त्याच जमिनीच्या वाटण्या होत होत प्रत्येक माणसाच्या वाट्याला कमी कमी जमीन येऊ लागते. जमीन जितकी कमी होते तेवढी ती किफायतशीर होत नाही. १९७० च्या दशकात भारतात दरडोई दोन एकर जमीन होती, पण आज प्रत्येकाच्या वाट्याला जेमतेम अर्धा ते एक एकर जमीन येत आहे. एक एकर जमिनीचा मालक स्वत:ची बैलजोडी सांभाळू शकत नाही. २० ते ३० एकर जमिनीचा मालक एक बैलजोडी सांभाळू शकतो. त्यापेक्षा कमी जमीन असणार्या शेतकर्यांना जमिनीतील मशागतीबाबत नेहमी इतरांवर अवलंबून राहावे लागते आणि त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. जमीनधारणा हा भारतातल्या शेतीचा प्रश्न आहे, ही बाब डॉ. आंबेडकरांनी पहिल्यांदा मांडली होती. एवढ्या नेमकेपणाने भारताच्या शेतीची समस्या कोणीच सांगितली नव्हती. बिगर किफायत शेती होत असल्याने अनेक समस्या निर्माण होतात. कमी जमिनीचे मालक नेहमीच दारिद्र्यात जीवन कंठत राहतात. त्यामुळे जमीन धारणेचा प्रश्न सोडवणे आणि जमिनीची उत्पादकता वाढवणे हेच शेती पुढच्या प्रश्नावरचे उत्तर आहे, असे डॉ. आंबेडकर यांनी म्हटले होते. प्रत्येकाच्या मालकीची जमीन कमी आहे की जास्त आहे याला काही महत्त्व नाही; तर ती जमीन किती उत्पादन देते याला महत्त्व आहे, असे आंबेडकरांचे मत होते. त्यांनी या प्रश्नावर मोठा व्यवहार्य तोडगाही सुचविला होता. डॉ. आंबेडकर यांनी १९४५ मध्ये लिहिलेल्या 'स्टेटस अँड मायनॉरिटीज' या पुस्तकात त्यांनी शेतीचे राष्ट्रीयीकरण करण्याचा स्पष्ट आग्रह धरला होता. त्यांचे मत होते की, भारतातील बहुतांश लोकसंख्या शेतीवर अवलंबून असूनही ही शेती अव्यवस्थित, अकार्यक्षम आणि शोषणाधिष्ठित आहे. भांडवली शेतीमुळे जमीनदार आणि सावकारांचे वर्चस्व वाढले असून, शेतकर्यांना त्यांच्या श्रमाचा पूर्ण मोबदला मिळत नाही. त्यामुळे त्यांनी असा प्रस्ताव मांडला की, शेती आणि तिचे उत्पादन सरकारी मालकीखाली असावे. सरकार शेतकर्यांना भूमिहीन कामगार म्हणून न ठेवता, सहकारी शेती व्यवस्थेद्वारे त्यांना एकत्र आणावे. त्यामार्फत उत्पादन वाढेल, शेती शाश्वत बनेल आणि ग्रामीण भागात सामाजिक समता प्रस्थापित होईल. आंबेडकर यांचे पाणी व्यवस्थापनासंबंधीचे योगदानही फार मोठे आहे. ते जेव्हा मध्य प्रदेशातील महामंडळाचे मंत्री होते (१९४२-४६), तेव्हा त्यांनी मोठ्या प्रमाणात सिंचन प्रकल्प सुरू केले. 'दामोदर खोरे प्रकल्प', 'माही प्रकल्प' किंवा 'हिराकुंड धरण' यांसारख्या योजनांचा प्रारंभ त्यांच्या काळात झाला. त्यांचे मत होते की, शेतीसाठी पाण्याची खात्रीशीर उपलब्धता ही उत्पादनवाढीची पूर्वअट आहे. त्यामुळे त्यांनी जलनीतीला राष्ट्रीय प्राधान्य देण्याचे समर्थन केले.

डॉ. आंबेडकर स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश व्हॉईसरॉयच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे मंत्री होते. तेव्हा त्यांनी शेतीला हक्काचे पाणी देता येणे शक्य आहे की नाही हे जाणून घेण्यासाठी भारतात उपलब्ध असलेल्या पाण्याचे ऑडिट केले होते. त्यांनी उत्तर भारतातील नद्यांना येणारे पूर आणि त्यामुळे होणारी अपरिमित हानी पाहिली होती. हे पूर असे थैमान घालत असतानाच दक्षिण भारतात पाण्याअभावी होणारे हालही पाहिले होते आणि १९४२ च्या सुमारास उत्तर भारतातील आणि दक्षिण भारतातील नद्या परस्परांना जोडणारा नदीजोड प्रकल्प पुरस्कारला होता. नंतर १९५२ मध्ये या प्रकल्पाची जोरदार चर्चा झाली आणि ती शांत झाली. नंतर १९७७ मध्ये मोरारजी देसाई हे पंतप्रधान झाल्यानतर या कल्पनेला उठाव मिळाला. मात्र त्याकाळी या प्रकल्पावर ८ हजार कोटी एवढा प्रचंड होणार, असा अंदाज आल्यामुळे ही योजना तेव्हाही बासनात गुंडाळली. २००४ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान असताना या प्रकल्पाची पूर्तता करण्याचा संकल्प सोडला; पण त्यांचे सरकार सत्तेवरून जाताच नवीन सरकारने ही योजना पुन्हा गुंडाळून ठेवली. आता मोदी सरकार या प्रकल्पाला मूर्तरूप देण्याचा प्रयत्न करत आहे, पण या प्रकल्पाचे महत्त्व सर्वात आधी डॉ. आंबेडकर यांना कळले होते आणि पाटबंधारे मंत्री म्हणून त्यांनी या योजनेची कल्पना जाहीरपणे पहिल्यांदा बोलून दाखवली होती.

आंबेडकर यांचे विचार शेतीकडेही वळलेले होते. त्यांनी कृषी विद्यापीठे आणि संशोधन केंद्रांची गरज अधोरेखित केली होती. त्यांना वाटत होते की, भारतातील शेती ही पारंपरिक पद्धतीपेक्षा वैज्ञानिक संशोधन आणि तांत्रिक प्रगतीच्या आधारे उभी राहायला हवी. आज ज्या कृषी तंत्रज्ञानावर आधारित हरित क्रांती आपण पाहतो, त्याची बीजे बाबासाहेबांच्या विचारांमध्ये पूर्वीच रोवलेली होती. डॉ. आंबेडकर हे बुद्धिवंत, तत्त्वज्ञ, कायदेपंडित, समाजसुधारक आणि दूरदर्शी अर्थशास्त्रज्ञही होते. त्यांच्या आर्थिक विचारांना भक्कम सैद्धांतिक पाया होता, एकूणच त्यांनी शेतीविषयी जे विचार मांडले, ते आजही आदर्श ठरणारे आहेत.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे या महामानवांचे विचार, मानव कल्याणासाठी लोकचवळ निर्माण करणारे




अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण देशात व इतर देशात महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची भीमजयंती आनंदात सर्वत्र साजरी करण्यात आली .त्यांचा जन्म दिनांक १४ एप्रिल १८९१ रोजी एका गरीब कुटुंबात झाला. त्यांनी त्यांना अवगत असलेल्या ज्ञाना चे बळावर आयुष्यभर अपार कष्ट करून ज्ञानसाधना करून अनेक विषयात ज्ञानशांखावर त्यांनी प्रभुत्व संपादन केले. याद्वारे त्यांनी स्वतःची शैक्षणिक उन्नती तर साधलीच विशेषता सर्व सामान्य, नोकरीपेशा महिला, व अश्या विविध घटकांतील अन्यायग्रस्त समाजासाठी त्यांनी मोलाचे अतुलनीय कार्य केले त्यांना न्याय हक्काचा रस्ता दाखविला अशा लोकांसाठी त्यांनी त्यांच्यामध्ये चेतना,जागृती निर्माण करण्यासाठी विपुल लिखाण केले ज्या मधून आपल्यावर कोणीतरी अन्याय करत आहे ज्यांचेमूळे आपला सामाजिक विकास थांबला आहे, अडचण निर्माण होते आहे याची जाणीव आम्हाला जेवढ्या लवकर होईल तितके ते आमचे हिताचे ठरेल असेही तत्कालीन त्यांनी मोठ मोठया सभेत भाषणवेळी किंवा सभेत संबोधित करतांना अनेक वेळा सांगून ठेवले आहे. भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर बोलले आहे.अश्या पद्धतीने जातीपातीचा विचार न करता सर्वांसाठी मानव कल्याणासाठी त्यांनी कार्य केले. स्त्रियांच्या सन्मानासाठी केलेल्या कार्यात बाबासाहेबांचा सिंहाचा वाटा आहे. प्रत्येकाने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा विरोध करायलाच पाहिजे. ✻वाचाल तर वाचाल,✻ असा संदेश बाबासाहेबांनी दिल्यामुळे आज अन्यायग्रत्तांना गुलामगिरीच्या बेड्या तोडून ताठ मानेने जगायला भारतरत्न बाबासाहेबांनी शिकविले. अन्यायग्रस्ताच्या वाट्याला आलेले दु:खे बाबासाहेबांनी स्वतः अनुभवली होती त्यामुळेच ते आपल्या बांधवांना आत्मविकासाचा योग्य मार्ग दाखवू शकले. जुन्याकाळी समाज अज्ञान, निरक्षरत: अनिष्ट रूढी परंपरा,अंद्रश्रद्धा, गरिबी अशा व्याधींनी समाज पोखरलेला होता, दु:खी होता. अन्याय, छळ, अपमान ,अशा जगण्याने समाजाचे रोजचे जीवन दु:खमय झाले होते. अशा समाज बांधवांची दु:खे भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेबांनी पाहिले आणि स्वत:ही ती दैनदीन जीवनात त्यांनी अनुभवली होती. अश्या माझ्या बांधवांचें दु:ख मी दूर करीन या हेतूने अनेक कार्य त्यांनी त्यावेळी केले मानवतेच्या. नागरिकांचा अधिकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेबांनी अपार कष्ट करून मिळवून दिला.समाजउन्नतीसाठी त्यांच्या मध्ये चेतना, ऊर्जा निर्माण व्हावी या साठी अनेक महान ग्रंथ भारतरत्न बाबासाहेबांनी लिहून समाजासाठी उपलब्ध करून दिले. स्वतंत्र भारता साठी राज्यघटना लिहून भारतात लोकशाही राज्यव्यवस्थेचा मजबूत पाया घातला म्हणून आज भारत हे जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र ठरले भारतरत्न बाबासाहेबांनी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत स्वतंत्यांचे रक्षणासाठी नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांनी कार्य केले, ज्या कार्यामुळे भारत देश प्रसेंशेस, सन्मान पात्र ठरला, ज्या मुळे जगात आपल्या भारतदेशांची. एक वेगळी शाप , ओळख ठरली

अश्या माझ्या भीमाची पुण्याई वर्णावी किती भारतरत्न बाबासाहेब आंबेडकरांन संबंधी कितीही तरी लिहिले तरी कमीच पडेल असे त्यांचे महान त्यांचे कार्य आहे. अशा भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमिताने ✻ तु फुकलेस रणशिंग अगाध ज्ञानाच्या बळावर

तु तोडल्यास गुलामगिरीच्या पायातल्या बेडया त्या फक्त आणि फक्त ज्ञानाच्या बळावर ✻

जयंती चे निमित्ताने भारतरत्न, महामानवाला विनम्र अभिवादन !



**उमेश महादेवराव ढोणे**
मो. ९०४९०६७३३१

# हेल्दी डाएटमध्ये पनीर की टोफू, योग्य पर्याय कोणता?

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**

सध्या हेल्दी डाएट आणि फिटनेसबाबत जागरूकता वाढल्याने लोक आपली आहारशैली अधिक सजगपणे निवडू लागले आहेत. प्रथिने, कॅल्शियम आणि हेल्दी फॅट्सचा समावेश डाएटमध्ये होत आहे. मात्र, शाकाहारी लोकांसाठी प्रथिनांचा चांगला स्रोत शोधणं थोडं कठीण असतं. टोफू आणि पनीर हे दोघंही उत्तम प्रथिनांचे स्रोत आहेत.

दिसायला दोघंही सारखे असले, तरी त्यांचं बनवण्याची प्रक्रिया, पोषकतत्त्वं आणि फायदे वेगवेगळे आहेत. चला तर पाहूया टोफू आणि पनीरमधील फरक व कोणतं आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे.




**पनीरचे फायदे:**


**प्रथिनांचा समृद्ध स्रोत:** पनीरमध्ये उच्च प्रमाणात प्रथिने असतात, जे मसल्स वाढवण्यासाठी आणि शरीर मजबुत ठेवण्यासाठी मदत करतात.

हाडे आणि दात मजबूत करतो: पनीरमध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरस भरपूर प्रमाणात असतात, जे हाडे आणि दात मजबूत ठेवतात.

**ऊर्जा वाढवतो:** पनीरमध्ये फॅटचे प्रमाण जास्त असल्याने ते शरीराला त्वरित ऊर्जा पुरवते.

वजन वाढवण्यासाठी उपयोगी: ज्यांना वजन वाढवायचं आहे, त्यांच्यासाठी पनीर हा एक चांगला पर्याय आहे.

ब्लड शुगर नियंत्रणात ठेवतो: पनीरचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्यामुळे तो ब्लड शुगर लेव्हल नियंत्रणात ठेवतो.




मेंटल फोकस सुधारतो: पनीरमध्ये असणारे काही पोषक घटक मेंदूच्या कार्यक्षमतेला मदत करतात.

**दीर्घकाळ पोट भरल्यासारखं वाटतं:** प्रथिने आणि फॅट्समुळे पनीर खाल्ल्यावर भूक कमी लागते, जे वजन नियंत्रणासाठी मदत करू शकते.

**टोफूचे फायदे:**

**कमी कॅलरी आणि फॅट:** टोफूमध्ये कॅलरी आणि फॅट कमी असतात, त्यामुळे ते वजन कमी करणाऱ्या आहारात उपयुक्त आहे.

**हृदयासाठी फायदेशीर:** टोफूमध्ये कोलेस्टेरॉल नसतो, त्यामुळे हृदयाचे आरोग्य चांगले राहते.

शुद्ध वनस्पतीजन्य प्रथिने स्रोत: टोफू हे सोयापासून बनते आणि शाकाहारी तसेच व्हेगन लोकांसाठी प्रथिनांचा उत्तम पर्याय आहे.

अँटीऑक्सिडंट्सने भरलेले: यामध्ये खीषश्रर्रीपशी नावाचे अँटीऑक्सिडंट्स असतात, जे शरीराच्या पेशींना नुकसानापासून वाचवतात.

**हार्मोन्सचं संतुलन राखतो:** टोफूमधील घटक महिलांमध्ये हार्मोनल बॅलन्स राखण्यास मदत करतात, विशेषतः मासिक पाळी आणि रजोनिवृत्ती दरम्यान.

पचनासाठी फायदेशीर: टोफूमध्ये थोडं फायबर असतं, जे पचनसंस्थेला मदत करतं.

लॅक्टोज इन्टॉलरंट लोकांसाठी योग्य: दूध व दुग्धजन्य पदार्थ सहन न होणाऱ्या लोकांसाठी टोफू एक उत्तम पर्याय आहे.

**काय निवडावं?** जर तुम्हाला मसल्स वाढवायचे असतील, तर पनीर फायदेशीर ठरेल. पण जर वजन कमी करायचं असेल किंवा कमी फॅट आणि कोलेस्टेरॉलयुक्त पर्याय हवा असेल, तर टोफू अधिक चांगला पर्याय आहे. व्हेगन किंवा लॅक्टोज इन्टॉलरंट लोकांसाठी टोफू एक उत्तम पर्याय ठरतो.

# आंबा फळातील नुकसान टाळण्यासाठी आंब्याची काढणी कशी करावी?




**दि. ४विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्रामध्ये विशेषतः कोकणामध्ये आंब्याचा हंगाम मार्च-मे या कालावधीत दिसून येतो, तर महाराष्ट्राच्या उर्वरित भागांमध्ये आंब्याचा हंगाम उशिरा म्हणजेच मे महिन्यात सुरू होऊन ऑगस्टमध्ये संपतो.

**आंबा फळ काढणीसाठी महत्वाचे मुद्दे**-ज्या भागामध्ये आंबाफळेकाढणीस तयार झालेली असतील अशा ठिकाणी आंब्याची काढणी झेल्याच्या सहाय्याने देठासह चौदा आणे (८५ ते ९० टक्के) पक्वतेला करुन घ्यावी.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

फळांची काढणी करतांना फळांचा देठ साधारणतः ४ ते ६ सें. मी. ठेवून काढणी करावी. म्हणजे देठातून चिक बाहेर पडून फळावर डाग पडत नाही.

त्यासाठी बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांनी शोधून काढलेल्या नुतन झेल्याचा वापर करावा. त्यामुळे सूक्ष्म जिवाणूंचा प्रवेशास प्रतिबंध होतो. शिवाय देठाजवळ फळ काळे पडत नाही.

आंबा फळांची काढणी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उन्हाची तीव्रता कमी झाल्यावर करावी.

उष्णतेमुळे फळांचे तापमान वाढून साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने आंब्याची फळे काढल्यानंतर लगेचच सावलीमध्ये ठेवावीत.

फळांची काढणी करतांना उन्हाने डागाळलेली व पक्षांनी खाल्लेली तसेच रोग किंवा कीडग्रस्त फळे अलग काढावीत.

फळांची काढणी झाल्यानंतर फळांचे तापमान ३० अंश सें. पेक्षा जास्त होऊ देऊ नये.

फळ काढणी केल्यानंतर झाडाच्या सावलीत बांबूच्या करंड्यात किंवा प्लास्टिकच्या क्रेटमध्ये व्यवस्थित ठेवावी. आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी.आंबा वाहतुक भरदिवसा उन्हामध्ये वाहनांच्या टपावरुन करु नये.

फळकूज ह्या काढणीपश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी फळांची काढणी देठासह करावी.काढणी नंतर फळे पोटॅशियम मेटाबायसल्फाईट ०.०५ टक्के (०.५ ग्रॅम प्रती लिटर पाणी) या रसायनाच्या ५० अं. सें. उष्णजल द्रावणात १० मिनिटे बुडवून नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत.

फळांची काढणी झाल्यावर फळावर नैसर्गिक चमक टिकून राहील यांची काळजी घ्यावी. त्यामुळे फळे आकर्षक दिसतात त्यामुळे त्यांना बाजारात चांगला भाव सुध्दा मिळतो.

# परसापूर येथील डांबर प्लांटमध्ये भीषण आग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४परतवाडा** परतवाडा-अंजनगाव महामार्गावर परसापूर लगत असणाऱ्या डांबर प्लांटमध्ये भीषण आग लागल्यामुळे लाखो रुपयांची संपत्ती जळून खाक झाल्याची खळबळजनक रविवारी (ता.१३) घडली.दुपारी चार वाजताच्या सुमारास प्लांटवर डांबरचे काम चालू असताना एक छोटासा ब्लास्ट होऊन आग लागली. आग लागताच मजुरांनी विझवण्याचा प्रयत्न केला. परंतु आगीने लगेच उग्र स्वरूप धारण केल्याने क्षणात संपूर्ण प्लांट हा आगीचा हवाली झाला. यामध्ये या ठिकाणचे सर्व आवश्यक साहित्य जळून खाक झाले.आग एवढी भीषण होती की आगीचे लोळ पाच किलोमीटरवरून दिसत होते. घटनेची माहिती अग्निशामक दल अचलपूर यांना मिळताच अग्निशमनच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या व महत्तप्रयासाने आग आटोक्यात आणली. सदर प्लांट हा परतवाडा येथील रोड व्यावसायिक आशितोष बरडिया यांचा असल्याची माहिती आहे.-



# मेळघाटात २८० कृत्रिम पाणवठे



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती** - मेळघाटातील जंगल उन्हाळ्यातील पानगळतीने भकास झाले आहे. अशातच उन्हाच्या तीव्रतेमुळे जीवाची लाहीलाही करणाऱ्या परिस्थितीत, वन्यप्राण्यांना तहान भागवण्यासाठी कृत्रिम पाणवठे हे जीवनदायी ठरत आहे. जिल्ह्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पात ३०३ नैसर्गिक जलस्रोत असून, यापैकी अनेक जलस्रोत आटलेले आहे. त्यामुळे वन विभागाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेले तब्बल २८० कृत्रिम पाणवठे वन्यप्राण्यांच्या तृष्णा तृप्तीसाठी महत्वाचे ठरत आहे.

उन्हाळ्यात मेळघाटातील जंगलात पाण्याचे नैसर्गिक स्रोत आटतात. - अशघ्रसंगी वन्यप्राण्यांसाठी कृत्रिम पाणवठे जीवनदायी ठरतात. सध्या उन्हाची तिव्रता वाढल्याने वन्य प्राण्यांची पाण्यासाठी भटकंती सुरू आहे. परंतु वन विभागाने वन्यप्राणी इतरत्र शहरी भागात किंवा शेतीकडे वळू नये यासाठी मेळघाटाच्या जंगलात २८० पाणवठे तयार केले असून, या पाणवठ्यांवर पाणीपुरवठा केला जात आहे. या कृत्रिम पाणवठ्यांमुळे आता वन्य प्राण्यांची पाण्यासाठी होणारी भटकंती थांबण्यास मदत होणार आहे. मेळघाटच्या जंगलात वाघ, बिबट, अस्वल, निलगायी, रानगवे, हरण अशा आदी वन्यप्राण्यांचे वास्तव्य आहे. या वन्यप्राण्याची भिस्त नैसर्गिक जलस्रोतांवर असते. परंतु उन्हाळ्यात नैसर्गिक जलस्रोत आटल्याने वन्यप्राण्यांना कृत्रिम पाणवठ्यांवरील पाण्यावरच तहान भागवावी लागत होती.-

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucngmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १४ एप्रिल २०२५ शहर/ग्रामिण


# अमरावतीत जन्मलेल्या व महाराष्ट्राचे भूषण गवई होणार सरन्यायाधीश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती** – भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना हे १३ मे रोजी निवृत्त होत आहेत. त्यांच्यानंतर भूषण गवई हे सरन्यायाधीश होणार आहेत. ते भारताचे ५२ वे सरन्यायाधीश असणार आहेत. सर्वोच्च न्यायालयातील सध्याच्या न्यायमूर्तीमध्ये भूषण गवई ज्येष्ठ असून पुढचे सरन्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश होणारे गवई हे नागपूर बार असोसिएशनचे तिसरे सदस्य आहेत. याआधी न्यायमूर्ती मोहम्मद हिदायतुल्ला आणि शरद बोबडे हे सरन्यायाधीश झाले होते.भूषण गवई यांना १४ मे रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सरन्यायाधीश पदाची शपथ देतील. भूषण गवई यांच्या कुटुंबाला आंबेडकरी चळवळीचा वारसा लाभला आहे. भूषण गवई यांचे वडील रामकृष्ण गवई हे आंबेडकरी चळवळीतले सक्रीय नेते होते. ते राज्यसभेचे खासदारही होते. रामकृष्ण गवई यांनी केरळ आणि बिहारच्या राज्यपालपदाची धुराही सांभाळली होती.अमरावतीत




जन्मलेल्या भूषण गवई यांनी नागपूर विद्यापीठात कला शाखेतून पदवी घेतली. त्यानंतर कायद्याची पदवीही घेतली. नागपूर बार असोसिएशनमध्ये न्यायमूर्ती गवई १९८५ मध्ये सहभागी झाले. त्यानंतर १९८७ ते १९९० या कालावधीत त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्र वकिली सुरू केली होती.मुंबई उच्च न्यायालय, नागपूर, औरंगाबाद, पणजी खंडपीठात न्यायमूर्ती म्हणूनही भूषण गवई यांनी काम केलंय. २००३ मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश झाले होते. त्यानंतर २००५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे कायमस्वरुपी न्यायाधीश बनले. २०१९ मध्ये त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून शिफारस केली गेली. त्यानंतर आता त्यांची सरन्यायाधीश पदासाठी शिफारस करण्यात आलीय. भूषण गवई हे २३ नोव्हेंबरला निवृत्त होणार असून त्यांचा कार्यकाळ सहा महिन्यांचा असणार आहे.–

# विदर्भवासीयांसाठी पुणे प्रवास खडतर! आझाद हिंदसह अनेक एक्स्प्रेस रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १४अमरावती :–** भर उन्हाळ्यात विदर्भवासीयांसाठी पुणे प्रवास खडतर बनला आहे.झारखंडमध्ये सुरू असलेल्या रेल्वे मार्गाच्या कामामुळे दुरांतो एक्सप्रेस, गीतांजली एक्सप्रेस आणि आझाद हिंद एक्सप्रेस अशा अनेक प्रमुख एक्सप्रेस सेवांसह



एकूण २६ गाड्या १५ दिवसांसाठी रद्द करण्यात आल्या आहेत. बिलासपूर आणि झारसुगुडा दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या लाईनचे कनेक्शन सुलभ करण्यासाठी दक्षिण पूर्व रेल्वेने ब्लॉकची घोषणा केली आहे, ज्यामुळे २४ एप्रिल पर्यंत रेल्वे सेवांवर परिणाम होणार आहे. त्याचा फटका विदर्भातील प्रवाशांना बसला आहे.

उन्हाळी सुट्ट्यांचा हंगाम सुरू असून, रेल्वेला प्रवाशांची गर्दी वाढू लागली आहे; पण रेल्वेकडून बिलासपूर विभागातील चौथ्या मार्गावरील 'कनेक्टिव्हिटी'चे काम सुरू करण्यात आले आहे.२३ एप्रिल पर्यंत हे काम चालणार आहे. त्याचा परिणाम काही रेल्वे गाड्यांवर झाला आहे. त्यामुळे या वेळांमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी प्रवाशांनी त्यांच्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, पुणे–हावडा आझाद हिंद एक्सप्रेस १० ते १९ एप्रिल आणि पुन्हा ११ ते २४ एप्रिल दरम्यान रद्द करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे मुंबई–हावडा गीतांजली एक्सप्रेस ११ आणि २४ एप्रिल रोजी धावणार नाही. हावडा–पुणे दुरांतो एक्सप्रेस १० ते २१ एप्रिल दरम्यान रद्द राहील. इतर प्रभावित गाड्यांमध्ये पोरबंदर–शालीमार एक्सप्रेस (९–१९ एप्रिल) आणि मुंबई–शालीमार ज्ञानेश्वरी एक्सप्रेस (११–२४ एप्रिल) यांचा समावेश आहे.विदर्भातून पुणे येथे ये–जा करण्यासाठी महाराष्ट्र एक्स्प्रेस आणि आझाद हिंद एक्स्प्रेस या दोनच गाड्या दररोज नियमित धावतात. इतर सर्व गाड्या वेगवेगळ्या दिवशी आहेत. त्यातही आझाद हिंद एक्स्प्रेस रद्द झाल्याने प्रवाशांची मोठी अडचण झाली आहे.

२०८२२ संत्रागाछी –पुणे हमसफर एक्स्प्रेस नागपूरहून दर रविवारी धावते, पण १३ एप्रिल आणि २० एप्रिल रोजी ही एक्स्प्रेस रद्द करण्यात आली आहे. तर २०८२२ पुणे–संत्रागाछी एक्स्प्रेस १४ एप्रिल आणि २१ एप्रिल रोजी रद्द करण्यात आली आहे. याशिवाय हावडा–पुणे दुरांतो एक्स्प्रेस देखील १७ आणि १९ एप्रिल रोजी रद्द करण्यात आली आहे, तर पुणे–हावडा १९ आणि २१ एप्रिल रोजी धावणार नाही, त्यामुळे प्रवाशांना पर्यायी साधनांचा वापर करावा लागणार आहे. रेल्वेच्या वेळापत्रकात बदल झाल्यामुळे अनेक प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# राज्यातील तीन हजार रुग्णवाहिकांची चाके थांबण्याच्या मार्गावर

## राष्ट्रीय आरोग्य अभियानाची वाहने : इंधन, दुरुस्तीच्या खर्चासाठी निधी देईना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती** – प्राथमिक आरोग्य केंद्र,उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आदी ठिकाणी रुग्णांच्या सेवेसाठी असलेल्या रुग्णवाहिकांची चाके थांबण्याच्या मार्गावर आहे. डिझेल, दुरुस्तीच्या खर्चासाठी सरकारकडून पैसा उपलब्ध करून दिला जात नसल्याने ही परिस्थिती निर्माण होत आहे. स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेल्या निधीच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जात आहे.

गरोदर माता, ० ते १ वर्षापर्यंतचे बालक, रुग्णाला इतर ठिकाणी हलविणे याशिवाय राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांकरिता या रुग्णवाहिकांचा वापर केला जात आहे. यासाठी लागणारे इंधन आणि दुरुस्तीच्या खर्चाकरिता



निधीच उपलब्ध नाही. इंधनाअभावी रुग्णसेवा प्रभावित होण्याची भीती स्थानिक पातळीवरील आरोग्य यंत्रणेकडून व्यक्त केली जात आहे. तसे पत्रव्यवहारहीआरोग्य सेवा तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान. संचालकांकडे अनेक ठिकाणाहून झालेले आहे. तूर्तास तरी या कागदांवर विचार झालेला नसल्याचे दिसून येते.

### तीन महिन्यांपासून नियोजन बिघडले

राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा आर्थिक बाबीसंदर्भात मागील तीन महिन्यांपासून ताल बिघडला आहे. प्रत्येक जिल्ह्याला जवळपास ९० ते १०० रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. मात्र, निधी नसल्यामुळे या रुग्णवाहिकांसाठी इंधनासह दुरुस्तीच्या खर्चाचा प्रश्न निर्माण झाला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे जिल्ह्याचे मासिक बजेट ८० ते ९० कोटी रुपये आहे. प्रत्यक्षात १५ ते २० कोटी रुपये देऊन बोळवण केली जात आहे.

# 'अलायन्स एअर'ने अमरावती विमानतळाला दिले शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव


## जिल्हाधिकारी म्हणतात..अद्याप ठरले नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती**

अमरावती जिल्ह्याच्या विकासात मैलाचा दगड ठरू पाहणाऱ्या अमरावती (बेलोरा) विमानतळाला अलायन्स एअर या विमान कंपनीने शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे नाव दिले आहे. अलायन्स एअरने जिल्ह्याचे खासदार खा. बळवंत वानखडे यांना पाठविलेल्या निमंत्रण पत्रातून ही बाब स्पष्ट झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे केंद्र व राज्य सरकारकडून नावाच्या अनुषंगाने अजून कोणतीही अधिसूचना निघालेली नाही, हे विशेष. स्थानिक प्रशासनाने सुद्धा या नामकरणास दुजोरा दिलेला नसून जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी अद्याप नावाबाबत ठरले नसल्याचे स्पष्ट केल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. ही सर्व परिस्थिती बघता नावावरून गोंधळात गोधळ सुरू असल्याचे स्पस्ट झाले.





Alliance Air Aviation Limited

गेल्या अनेक वर्षापासून असलेली अमरावतीकरांची मागणी आता पूर्णत्वास आली असून अमरावती विमानतळ प्रवासी वाहतुकीसाठी सज्ज झाले आहे. १६ एप्रिलचा मुहूर्त ठरला असून विमानतळाच्या उद्घाटनाची पत्रिका अलायन्स एअर या विमान कंपनीकडून वितरित केल्या जात आहे. अलायन्स एअरचे चेअरमन अमित कुमार यांनी जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे यांना उद्घाटनाचे रितसर पत्र पाठविले असून त्यामध्ये अमरावती विमानतळाचे नाव डॉ. पंजाबराव देशमुख अमरावती एअरपोर्ट अमरावती असे अंकित आहे. १६एप्रिलच्या उद्घाटन कार्यक्रमाला सकाळी १०.३० वाजता उपस्थित राहण्याचे त्यातून कळविण्यात आले आहे. हे निमंत्रण पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. पण, रविवारी उघड झालेल्या या नव्या घडामोडीला जिल्हा प्रशासनाकडून दुजोरा देण्यात आलेला नाही. राज्य व केंद्र शासनाचे तसे कोणतेही पत्र नाही. मग, अलायन्स एअरने कोणत्या आधारावर आपल्या निमंत्रण पत्रात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाचा उल्लेख केला आहे, या संदर्भात चर्चा होत आहे.

अमरावती (बेलोरा) विमानतळाला कोणाचे नाव द्यायचे, याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. सर्वप्रथम प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज यांचे दिले जाईल, अशी बातमी समोर आली होती. त्यानंतर काही लोकप्रतिनिधी, श्री शिवाजी शिक्षण संस्था, शाहू–फुले–आंबेडकर–भाऊसाहेब देशमुख फाऊंडेशन व नागरिकांकडून सदर विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुखांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली होती. अनेक युक्तीवादही त्यासाठी झाले.दुसरीकडे, अलायन्स एअरचे चेअरमन अमित कुमार यांच्या स्वाक्षरीने अमरावतीचे खा. बळवंत वानखडे यांना १० एप्रिल रोजी विमानतळ उद्घाटन कार्यक्रमाचे निमंत्रण पत्रिका पाठविण्यात आली आहे. ती १३ एप्रिलला समोर आले असून त्यात डॉ. पंजाबराव देशमुखअमरावती विमानतळ असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. अलायन्स एअरच्या पत्रिकेत डॉ. पंजाबराव देशमुख अमरावती विमानतळ असे नाव अंकित असल्याने विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी करणाऱ्यांना मनस्वी आनंद झाला होता. मात्र प्रशासनाच्या भूमिकेमुळे संभ्रम निर्माण होऊन विमानतळाला खरेच डॉ. पंजाबराव देशमुखांचे नाव दिले काय याबद्दल अनेकांनी प्रश्न उपस्थित केले. दरम्यान अलायन्स एअरकडून नावाची चूक झाल्याचे प्रशासनाने स्पष्ट केल्याने आनंद व्यक्त करणाऱ्यांचा हिरमोड झाल्याचे दिसून आले.

### नावात चूक झाली, दुरुस्त करताहेत



अलायन्स एअरच्या वतीने लोकप्रतिनिधींना जी निमंत्रण पत्रिका पाठविण्यात आली त्यामध्ये विमानतळाच्या नावाबाबत चूक झाली आहे. विमानतळाचे नाव दुरुस्त करण्याची प्रक्रिया सुरु असून दुसऱ्या निमंत्रण पत्रिका तयार केल्या जातील. तशाप्रकारचे आदेश अलायन्स एअरला दिले आहेत.

**सौरभ कटियार, जिल्हाधिकारी**

### महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाचा आक्षेप

अमरावती विमानतळाला नाव देण्याबाबत अद्यापही सरकारकडून अधिकृत घोषणा झालेली नाही. मात्र अलायन्स एअरमार्फत पाठविण्यात आलेल्या निमंत्रण पत्रामध्ये नावासंदर्भात केलेल्या उल्लेखाबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणकडून आक्षेप नोंदविण्यात आला असून याबाबत विमान कंपनीला कळविण्यात आल्याची माहिती आहे.

विदर्भ प्रजासत्ताक

# शिक्षकांना निरक्षरांच्या सर्वेक्षणाचे आणखी एक शाळाबाह्य काम..!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १४अमरावती** – नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत निरक्षरांचे सर्वेक्षण करण्यासाठी शिक्षण संचालकांनी (योजना) नुकतीच सूचना जारी केली आहे. परंतु शिक्षकांकडे अनेक प्रकारची कामे असताना शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाबरोबर आता निरक्षरांचे सर्वेक्षण करायचे कसे, असा प्रश्न प्रहार शिक्षक संघटनेने शिक्षणमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात उपस्थित केला आहे.

केंद्र शासनाने निरक्षरांना साक्षर करण्यासाठी नवभारत साक्षरता कार्यक्रम (उल्लास) उपक्रम सुरूकेला आहे. त्यासाठी निरक्षरांचे सर्वेक्षण केले जाते आणि त्यानंतर त्यांना साक्षर केले जाते. याबाबत महाराष्ट्राच्या शिक्षण संचालनालयाने (योजना) शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाबरोबरच आता




निरक्षरांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश काढले आहेत. शिक्षकांना निरक्षर व्यक्तींची नोंदणी 'उल्लास' मोबाइल ॲपवर करायची आहे. शिवाय, अध्यापनही करायचे आहे. राज्यातील सर्व शाळांनी दाखलपात्र विद्यार्थी सर्वेक्षण आणि शाळाबाह्य विद्यार्थी सर्वेक्षण याबरोबरच निरक्षरांचे सर्वेक्षण करावे, असे सूचनेत म्हटले आहे.भर उन्हात परीक्षा सुरू आहे.

शैक्षणिक गुणवत्ता का खालावते आहे? याचा साकल्याने विचार करून त्याबाबत उपाययोजना करण्याची गरज आहे, मात्र याकडे सरकारचे दुर्लक्ष असून शिक्षण विरोधी धोरण या स्थितीला कारणीभूत आहे.

# रेती माफियांचे बिहार स्टाईल धाडसअंगावर ट्रक आणून भातकुलीच्या तहसिलदाराच्या हत्येचा प्रयत्न


## जिनिंग मार्गावरील धक्कादायक घटना तिघांविरोधात गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४भातकुली–** रेती माफियांनी बिहार स्टाईलने पथकासह गस्तीवर असलेल्या मातिकिला तहसिलदारांच्या अंगावर ट्रक नेऊन त्यांच्या हत्येचा प्रयत्न केला. भातकुली पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या भातकुली ते ज्ञानज्योती स्कुल मार्गावर १२ एप्रिलला सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली. याबाबत भातकुली पोलिसांनी तहसिलदारांच्या तक्रारीवरून तिघांविरोधात गुन्हे दाखल केले आहे.ट्रक चालक, अतुल धदंर रा. निंभा, सुरज नागमोते रा. भातकुली अशी गुन्हे दाखल झालेल्या आरोपींची नावे आहे. तर तक्रारतर्फे तहसिलदारांचे नाव अजितकुमार वसंत येळेरा. कॅम्प, अमरावती असे आहे.माहितीनुसार, तहसिलदार अजितकुमार येळे १२ माहिती रोजी सायंकाळच्या सुमारास पथकासह अवैध गौणखनीजक वाहतुक रोखण्यासाठी पथकासह गस्तीवर होते.

दरम्यान पेढी नदीच्या पात्रातून निंभा मार्गे अवैध रेतीची वाहतुक होणार असल्याची गोपनीय माहिती तहसिलदार अजितकुमारयेळे यांना मिळाली. त्यामुळे अजितकुमार हे तहसिलदार सतीष बहाळे यांच्यासह दुचाकीने तातडीने त्या दिशेने निघाले. अजितकुमार निंभा येथील पेढील नदीच्या पुलावरून स्मशानभुमीकडे जाणाऱ्या मार्गावर आले असता त्यांना अवैध रेतीची वाहतुक करणारा ट्रक दिसला. अजितकुमार यांनी दुचाकीने ट्रकला ओव्हरटेक करून थांबविले.

परंतु, ट्रकचालक, ट्रकमधील अतुधर धंदर व सुरज नागमोतेयांनी ट्रक न थांबविता थेट अजितकुमार यांच्या अंगावर ट्रक नेऊन त्यांच्या चिरडण्याचा प्रयत्न केला. अजितकुमार व तलाठी सतीष बहाळे हे बाजूला सरकल्याने पुढील अनर्थ टळला. ट्रक फरार होताच अजितकुमार यांनी याबाबत भातकुली पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून भातकुली पोलिसांनी वरील नमूद आरोपींविरोधात हत्येच्या प्रयत्नाचा, अवैध गौणखनीजाची वाहतुक करणाऱ्या कलमान्वे गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# बाबासाहेबांच्या विचार कार्याचे अनुकरण करा - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विद्यापीठाच्यावतीने अभिवादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या रुपाने महत्वपूर्ण देणगी देशाला दिली आहे. संविधानात चेक्स ॲन्ड बॅलन्स सिस्टीम दिली असून आपल्या देशात संविधान विरोधी कुठलीही कृती करता येत नाही. नागरिकांना दिलेले हक्क अबाधित ठेवण्यासाठी संविधान महत्वपूर्ण कायदा आहे. देशात समानता प्रस्थापित व्हावी, या उद्देशाने बाबासाहेबांनी कार्य केले असून त्यांच्या विचार व कार्याचे अनुकरण करुन आपल्या देशाच्या विकासामध्ये हातभार लावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. विद्यापीठातील संविधान शिल्प या ठिकाणी आयोजित अभिवादन सोहळा कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून निवासी जिल्हाधिकारी श्री अनिल भटकर, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, अधिसभा सदस्य डॉ. रविंद्र मुन्द्रे, प्रा. श्रीकांत काळीकर, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.कुलगुरू पुढे म्हणाले, कायद्यानुसार देश चालावा, अशी संविधानात तरतूद आहे. या तरतूदीचे कुणी उल्लंघन केल्यास त्याविरुद्ध उच्च व सर्वोच्च न्यायालयात न्याय मागता येतो. संविधानाने सर्व भारतीयांना अधिकार दिले आहेत. सुदृढ लोकशाहीमुळे सर्व भारतीय गुण्यागोविंदाने जीवन जगत आहे. भारताच्या विकासाची गती झपाटएने पुढे जात असून नक्कीच आपण जगात विश्वगुरु होवू, असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. प्रमुख अतिथी श्री अनिल भटकर म्हणाले, बाबासाहेब केवळ अस्पृश्याचे असल्याचा चुकीचा समज पसरविला गेला. बाबासाहेब सर्व भारतीयांचे असून भारताच्या विकासासाठी त्यांचे फार मोठे योगदान आहे. सर्व समस्यांवर त्यांनी उपाय दिलेले आहेत. त्यांच्या कार्यापासून सर्वांनी प्रेरणा घ्यावी, असे सांगून जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्यात.यावेळी प्रा. श्रीकांत काळीकर यांनी बाबासाहेबांचे विचार तळागाळातील सर्वांपर्यंत पोहचले पाहिजे, यासाठी कार्य करण्याची गरज असल्याचे सांगितले. बाबासाहेबांचे जीवन सर्वांसाठी प्रेरणादायी असून त्यापासून सर्वांनी प्रेरणा घ्यावी व आपापल्या परीने देश विकासामध्ये योगदान द्यावे, असे डॉ. रविंद्र मुन्द्रे म्हणालेत.



**विद्यापीठ परिसर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान भव्यदिव्य समता तथा संविधान जनजागृती रॅली**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने विद्यापीठ परिसर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान भव्यदिव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, निवासी उपजिल्हाधिकारी श्री अनिल भटकर, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, अधिसभा सदस्य डॉ. रविंद्र मुन्द्रे, प्रा. श्रीकांत काळीकर, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड यांनी पुष्पार्पण करुन रॅलीला सुरुवात झाली. तत्पूर्वी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व मेणबत्तीप्रज्वलन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते करण्यात आले. भव्यदिव्य अशा रॅलीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व संविधान मुखपृष्ठाचे फलक हे रॅलीचे वैशिष्टए होते. रॅलीमध्ये 'बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' अशा घोषणा देत रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोहोचली. यावेळी विद्यापीठ प्राधिकारिणींचे सदस्य, प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठएा संख्येने उपस्थित होते.

# श्री गाडगे महाराज वृद्धाश्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

## वलगाव येथील सोहळ्यात बाबासाहेबांचे विचार आणि गाडगे बाबांशी ऋणानुबंधांना उजाळा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

वलगांव (ता. अमरावती) येथील श्री गाडगे महाराज वृद्धाश्रमात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती रविवारी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या सोहळ्यात बाबासाहेबांचे समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचे विचार तसेच राष्ट्रसंत गाडगे बाबांशी त्यांचे घनिष्ठ ऋणानुबंध यांना उजाळा देण्यात आला.वृद्धाश्रमाच्या सभागृहात सकाळी आयोजित या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण आणि दीपप्रज्वलनाने झाली. प्रदीप रंगारी यांनी सूत्रसंचालन करताना बाबासाहेबांच्या संविधान निर्मितीतील योगदान आणि सामाजिक क्रांतीतील योगदानाचा गौरव केला. उपस्थितांनी बाबासाहेबांच्या कार्याला अभिवादन करत त्यांचे विचार आत्मसात करण्याचा संकल्प घेतला. याप्रसंगी वलगांवचे सरपंच सुधीर उगले यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा गौरव करताना त्यांची आजच्या काळातील प्रासंगिकता अधोरेखित केली. ते म्हणाले, बाबासाहेबांनी आपल्याला शिक्षण, आत्मसन्मान आणि संघर्षाचा मार्ग दाखवला. त्यांचे विचार प्रत्येकाने अंगीकारले तरच खऱ्या अर्थाने सामाजिक समता साध्य होईल. त्यांनी तरुणांना बाबासाहेबांचे साहित्य वाचण्याचे आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध लढण्याचे आवाहन केले.वृद्धाश्रमाचे संचालक डॉ. कैलास बोरसे यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्यातील वैचारिक आणि सामाजिक नाते उलगडून सांगितले. ते म्हणाले, बाबासाहेबांनी संविधानाद्वारे देशाला समानतेची दिशा दिली, तर गाडगे बाबांनी अंधश्रद्धा आणि अस्वच्छतेविरुद्ध लढा दिला. या दोन थोर व्यक्तिमत्त्वांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत. तसेच त्यांनी वृद्धाश्रमात राबवल्या जाणाऱ्या सामाजिक उपक्रमांचा उल्लेख करत बाबासाहेब आणि गाडगे बाबांचा वारसा जपण्याचा निर्धार व्यक्त केला.या कार्यक्रमाला वलगांवचे सरपंच सुधीर उगले, वृद्धाश्रमाचे संचालक डॉ. कैलास बोरसे, नितीन शिरभाते, डॉ. प्रफुल्ल चहाकार, अवकाश बोरसे, अश्विन वाकोडे, प्रदीप रंगारी, आकाश गजभिये, मयूर मेश्राम, सुरज हजारे, रणजीत रंगारी, अंकुश रंगारी, अश्विन मेश्राम, सुयोग अढाऊ, संदीप सोनवणे, प्रतिक कापसेकर, प्रविण गजभिये, श्रीकांत डोंगरे, आयुष पळसपगार, रोहन जाटे, अक्षय गडलिंग, अमित वाडेकर, सुहाक काळपांडे, सुमित तायडे, नवनीत रंगारी, अमर साबळे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांवर चर्चा केली, तर काहींनी त्यांच्या कार्याला उजाळा देणारी काव्य पाठने सादर केली.

# नागपूर जिल्ह्यातील दोन वर्षांत स्फोटांच्या घटनांमध्ये ३१ ठार, स्फोटांच्या घटनांत २६ कामगार जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४नागपूर**



नागपूर जिल्ह्यात जवळपास ५० पेक्षा जास्त बारुद, स्फोटक सामग्री आणि अन्य सामग्री निर्माण करणाऱ्या कंपन्या आहेत. गेल्या दोन वर्षांत नागपूर जिल्ह्यात असलेल्या ५ कंपन्यांतील स्फोटात तब्बल ३१ कामगारांचा मृत्यू झाला तर तर २६ कामगार गंभीर जखमी झाले. एवढ्या मोठ्या जिवीतहाणीनंतरही प्रशासनाला जाग आली नाही. अजुनही अनेक कंपन्यांमध्ये सुरक्षिततेची साधने कामगारांना देण्यात येत नाही. एखादी अनुचित घटना झाल्यावरच प्रशासनाला जाग येते, असा आरोप होत आहे.

गेल्या दोन वर्षात हिंगणा,एमआयडीसी, धामना, कोतवालबड्डी आणि उमरेड येथील स्फोटक सामग्री करणाऱ्या कंपन्यांमध्ये स्फोट झाले आहेत.

वर्ष २०२५ मध्ये कोतवालबड्डी आणि उमरेडमधील कंपन्यांमध्ये स्फोटाच्या घटना घडल्या. फेब्रुवारी २०२५ मध्ये कोतवालबड्डीतील एशियन फायर वर्क्स कंपनीत स्फोट झाला आणि दोन कामगार जागीच ठार झाले तर तीन कामगार गंभीर जखमी झाले होते. तर एप्रिलमध्ये उमरेडमधील एमएमपी कंपनीतील स्फोटात ५ कामगार ठार तर ७ कामगार गंभीर जखमी झाले. त्यापैकी काही कामगारांची प्रकृती चिंताजनक आहे.गेल्या वर्षी १३ जून २०२४ ला धामना येथील चामुंडी एक्सप्लोसिव्ह कंपनीत फटाक्यांच्या वातीला लागणाऱ्या बारुदचा स्फोट झाला. या स्फोटतात ९ कामगारांचा भाजून मृत्यू झाला होता. त्यामध्ये काही महिला कामगारांचाही समावेश होता. मृत कामगार कंपनीच्या शेजारच्या तीन गावातील होते. गावात एकाच वेळी अंत्यसंस्कार करण्यात आले होते. त्यानंतर १७ डिसेंबर २०२३ ला बाजारगावातील सोलार एक्सप्लोसिव्ह कंपनीत स्फोट झाला होता. या स्फोटातसुद्धा ९ कामगाराचा कोळसा झाला होता. मृतांमध्ये तब्बल ६ महिलांचा समावेश होता.१२ ऑगस्ट २०२३ मध्ये इकोनॉमिक्स एक्सप्लोसिव्ह कंपनीत स्फोट झाला. या स्फोटात दोन कामगार ठार झाले. तसेच एमआयडीसीतील कटारिया ॲग्रो कंपनीत झालेल्या स्फोटात चार कामगारांचा मृत्यू झाला होता तर तीन कामगार गंभीररित्या भाजले होते. पूर्वीही आणखी काही बारुद कंपन्यांमध्ये स्फोट होऊन जिवीतहाणी झाली आहे. मात्र, अशा स्फोटाच्या घटनानंतरच प्रशासनाला जाग येते. त्यानंतरच खबरदारीच्या उपयायोजना राबविण्यात येतात.

# भीम पहाटेने उजळली धामणगावची सकाळ

## भीमराया घे तुला या लेकरांची वंदना ! डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाला उसळला भीमसागर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४धामणगाव रेल्वे**

भीम पहाटया कार्यक्रमाने धामणगावची सकाळ सोमवारला (ता.१४) उजळली.निमित्त होते डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचे.भीमगीतांनी उपस्थित मंत्रमुग्ध झाले.परिसरातील सर्व आंबेडकरी संघटनेतर्फे या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी गौतम बुद्ध,बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले.

करतो वंदन तुला बा भीमा
जगी बुद्ध गाजला
बौद्ध धम्म लाभला

या गीताला उपस्थितांनी दाद दिली.

लिखा है संविधान
यह है भारत की शान




अशा प्रकारची भीमगीते सादर केली.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त येथील नगरपरिषद प्रांगणात भीमसागर एकत्र आला होता .धामणगाव परिसरातील सर्व आंबेडकरी संघटनेतर्फे सकाळीच भीमपहाट संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.'अभिवादन बाबा तुम्हा लेकरांचे' या संगीतमय कार्यक्रमात तुषार शंभरकर, त्रिशा भगत, श्रेयस सोमकुवर,दिशा नाईक,स्निधा बोरकर, संबोधी अर्जुने, प्रियांशी खेडकर, श्रेयश, तुषार, मनस्वी खडसे, स्नेहांशू हेंडवे, मनस्वी खडसे, त्रिशा भगत, स्नेहांश हेंडवे, मनस्वी खडसे व आदींनी भीम गीते सादर केली.सकाळी संगीतमय कार्यक्रमाच्या समारोपानंतर पुन्हा भीमसैनिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्रिसरण पंचशीलाद्वारे अभिवादन केले.दुपारी व सायंकाळी भारतीय बौद्ध महासभेद्वारे व समता सैनिक दलाद्वारे विविध कार्यक्रम घेण्यात आले. संध्याकाळी धामणगाव नगरातील समस्त बौद्ध बांधवांनी भव्य मिरवणुकीद्वारे मानवंदना दिली. यामध्ये धम्मोदय बुद्ध विहार ,मानवता बुद्ध विहार,जीवक बुद्ध विहार ,मैत्रेय बुद्ध विहार, सिद्धार्थ पंचशील बुद्ध विहार समितीद्वारे भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

धामणगाव परिसरातील सर्व आंबेडकरी संघटनेतर्फे बालकलावंतानी 'अभिवादन बाबा तुम्हा लेकरांचे' हा संगीतमय बहारदार कार्यक्रमात माझ्या बा भिमाला, ज्यांनी नाकारले,सारी कमाई,भीमराज कि बेटी,केले कष्ट मानवतेला,काळजावर कोरल नाव,थांबा हो थांबा,आकाश मोजतो आम्ही,भीमाला सलामी,नांदण नांदण,भीम मोत्याचा हार,माझी आजी - मनस्वी,घबराये जब मन अनमोल, बुद्ध चरणी ग, त्रिवार वंदन गुलामी का टूट गया जाल,अशी लाजुन, भीमाला सलामी, आकाशातला तारा, भीम माझा ग, दिल्लीत भाषण, भिम नावाचा सूर्य, गुलामी का तूट गया जाल, दिल्लीच दालन,रमाची चूल, दादा थांबव रे गाडी, काजू बदाम पिस्ता, बादशाहीतला त्या मुकुटातला ही गीते अत्यंत सुमधुर आवाजात सादर केली.स्फूर्ती निर्माण होईल अशी गीते सादर करण्यात आली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सदैव प्रेरणादायी - प्रविण पोटे पाटील

## भाजपा अमरावती शहरच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निम्मित अभिवादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

भारतीय जनता पार्टी अमरावती शहरजिल्हा अध्यक्ष व भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या वतीने आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त इर्विन चौक येथे पुतळ्याला हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि सामाजिक न्यायाचे प्रणेते वंदनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्यासाठी सदैव प्रेरणादायी आहेत.शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा! त्यांनी दिलेला हा मंत्र आजही नवभारताच्या उभारणीसाठी दिशादर्शक आहे असे प्रतिपादन यावेळी भाजपा अमरावती शहर अध्यक्ष श्री प्रविण पोटे पाटील यांनी केले यावेळी जयंत डेहनकर, शिवराय कुळकर्णी, दिनेश सूर्यवंशी,रविंद्र खांडेकर, चेतन पवार, किरण पातूरकर , सिद्धार्थ वानखडे, सतीश करेसीया, विवेक कलोती, अनिता ताई राज, गंगाताई खारकर, कौशिक अग्रवाल सह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# बुलढाण्याच्या आठवडी बाजारात अग्नितांडव, जीवितहानी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४बुलढाणा**

विदर्भाचे प्रवेश द्वार असलेल्या मलकापूर येथील आठवडी बाजारात काल मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत सहा दुकानें व त्यातील मालासह जळून खाक झाली. सुदैवाने जीवित हानी झाली नसली तरी व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.काल रविवारी १३ एप्रिल रोजी मध्यरात्री ही आग लागल्याचे परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास आले. स्थानिक रहिवासीयांनी ही माहिती मलकापूर नगर परिषदेचे अधिकारी, अग्निशमन दल कर्मचारी, संबंधित व्यापाऱ्यांना दिली. मात्र या आगीने उग्रस्वरूप धारण केल्याने अस्थायी स्वरूपाची सहा दुकानें त्यातील धान्य व इतर मालसह आगीच्या भक्ष्य स्थळी पडली.आपल्या दुकानांसह गोदाम वाचवण्यासाठी सर्वांची पळापळ सुरू झाली.



या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक गणेश गिरी यांच्यासह पोलीस पथकआठवडी बाजार परिसरात दाखल झाले. मलकापूर नगर परिषदेच्या अग्निशमन दलानेही घटनास्थळी दाखल झाली आग विझवण्यास सुरुवात केली. नगर पालिकेचे भोपळे व पोलीस कर्मचारी आनंद माने यांनी सहकार्य केले केले. या आगीत ५ ते ६ दुकाने जळून खाक झाली. तसेच तर इतर दुकानांसह नजिकच्या गोदामांना आगीची झळ पोहोचली. या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसल्याने संभाव्य अनर्थ टळला. आज सोमवारी, १४ एप्रिल रोजी दुपार पर्यंत आगीचे कारण कळू शकले नाही. त्यामुळे व्यावसायिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.शहरातील आठवडी बाजारात अनेक दुकाने, गोदामे असून, किरकोळ व्यापाऱ्यांच्या मोठा व्यवसाय चालतो. रविवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास आठवडी बाजारात भीषण आग लागली. त्यामुळे व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली.

# सर्वोदय कॉलनी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

सर्वोदय कॉलणी, अमरावती येथील संत रविदास महाराज सभागृह येथे सर्वोदय कॉलणी सोसायटी व राष्ट्रीय चर्मकार महासंघ यांच्या सयुक्तवतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नरसिंह ऊजंबा परमार हे होते. तर प्रमुख अतीथी म्हणुन सर्वोदय कॉलणीचे अध्यक्ष सुधाकर नाचणे,शिक्षक आघाडी जिल्हा उपाध्यक्ष प्रा.अरुण बुंदिले,सामाजिक कार्यकर्ते प्रकाश शेलापुरकर,राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे,शहर अध्यक्ष योगेश पखाले,प्रा.डॉ.सजय खडसे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुकर बुंदिले यांनी तर संचालन योगेश पखाले यांनी केले.आभारप्रदर्शन निलेश जामठे यांनी केले.



सर्वप्रथम भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून उपस्थित सर्व मान्यवरांनी विनम्र अभिवादन केले.यावेळी डॉ.गजानन तायडे,कृष्णा मोहकर,डॉ.तुषार गांवडे,गजानन पिंजरकर,विजय चापके,रामदास इंगळे,संजय डाखोडे,श्रीमती शोभाताई देऊळकर,सौ.सुनिता तायडे आदिसह परिसरातील समाज बांधव तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १३४ वी जयंती : उन्हाच्या चढत्या पाऱ्यातही अविस्मरणीय उत्साह

# भीमरायांच्या विचारांपुढे नतमस्तक झाला विराट निळा जनसागर









## रिपाईचे नेते राजेंद्र गवई यांच्या वतीने १३४ किलोचा केक कटींग

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अमरावतीच्या इर्विन चौकातील बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी हजारो आंबेडकरी अनुयायांची रात्री १२ वाजता गर्दी उसळली होती, यावेळी रात्री बारा वाजताच प्रचंड फटाक्यांच्या आतषाबाजी करत जल्लोष करण्यात आला, रिपब्लिकन पक्ष गवई गटाच्या वतीने राजेंद्र गवई



यांनी तब्बल १३४ किलोचा केक कापत आंबेडकर जयंतीच्या यावेळी सर्वांना शुभेच्छा दिल्या, यावेळी आमदार रवी राणा, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, सामाजिक कार्यकर्ते गुणवंत देवपारे उपस्थित होते, यावेळी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

## सामाजिक दायित्वाचा दिला परिचय

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात अभिवादनासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो अनुयायांची गर्दी झाली होती. त्यामुळे विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, शैक्षणिक संघटना, कर्मचारी संघटनांनी पिण्याचे पाणी, मसाला भात, भोजनदान, सरबत, लाडू, मिठाईचे वाटप करून सामाजिक दायित्वाचा परिचय दिला. रात्री उशिरापर्यंत स्टॉलवर पाणी, खाद्यपदार्थ वाटप करण्यात आले.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

दरवर्षीप्रमाणे यंदाही भीमजयंतीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महापालिका क्षेत्राबरोबरच जिल्ह्यात सर्वत्र विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन यावेळी करण्यात आले होते. शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पहाटे ५ पासूनच आपल्या उद्धारकर्त्याला अभिवादन करण्यासाठी हजारोंचा जनसागर उसळला होता. पहाटे लागलेली अभिवादनाची रांग दुपार नंतरही कायम होती.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती उत्सव जिल्ह्यात मोठ्या उत्साहात पार पडला. रविवारी रात्री १२ वाजताच इर्विन चौक, भीमटेकडी, तसेच विविध नगरात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर झाला. यावेळी पांढरेशुभ्र कपडे, निळे झेंडे, निळीची उधळण, डोक्यावर निळे फेटे अन् निळी टोपी घातलेल्या अनुयायांना पाहून महामानवाला अभिवादनासाठी शहरात निळा जनसागरच आल्याचा प्रत्यय यावेळी आला. महामानवाच्या पूर्णाकृती पुतळा परिसरातही पहाटेपासूनच अभिवादनासाठी अनुयायांची रांग लागली होती.

## भीम गीत, समाज प्रबोधनाचे कार्यक्रम


आंबेडकर चौकात सकाळी ७पासूनच भीम गीत तसेच सामाजिक प्रबोधनाच्या कार्यक्रम झाले. यामध्ये अभिजित बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्था व एकता रॅली आयोजन समितीच्यावतीने दुपारी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये सामूहिक अभिवादन सोहळा, भीम गीत, सांस्कृतिक कार्यक्रम, कला व नृत्य सादरीकरण कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## तथागत, महामानवाच्या प्रतिमांची विक्री जोरात

तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, रमाई आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमांची विक्री अधिक झाल्याची माहिती एका विक्रेत्याने दिली. बुद्ध, भीमाचे लॉकेट, चेन, निळे दुपट्टे, झेंडे पंचशील ध्वज तसेच हार-फुलांच्या विक्रेत्यांनीही बाबासाहेबांची जयंती 'कॅश' केली. त्याचबरोबर लाखो रुपयांची पुस्तके व ग्रंथ विक्रीदेखील यावेळी झाली.

# महामानवाच्या पुतळा परिसरात आकर्षक रोषणाई; चहुकडे लागले अभिवादनाचे पोस्टर्स

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**



दरवर्षी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी हजारोंच्या यांच्या संख्येने अनुयायी हे आपल्या मुक्तिदात्याला अभिवादन करण्यासाठी शहरातील इर्विन चौक स्थित डॉ. बाबासाहेबआंबेडकर पुतळा परिसरात एकत्र येतात. यंदाही दोन दिवसांपासूनच या परिसरात जयंतीची जोरदार तयारी सुरू होतो. या परिसरात मोठ्या प्रमाणावर आकर्षक रोषणाईने सजावट तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रशासनाने संपूर्ण पुतळा परिसराची स्वच्छता केली असून, चौकामध्ये जयंतीच्या पूर्वसंध्येलाच विविध पुस्तक विक्री तसेच मूर्ती विक्रीची दुकानेदेखील सजली आहेत. भीम जयंती साजरी करण्यासाठी भीमसैनिक सज्ज झाले आहेत. इर्विनचौकास्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ आकर्षक सजावट करण्यात आली.

इर्विन चौक परिसरात साहित्य, मूर्तीची दुकाने सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सौंदर्गीकरण समितीच्या वतीने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १३ एप्रिलच्या रात्रीपासून शहरातील अनुयायी हे मुक्तिदात्याला अभिवादन करण्यासाठी एकत्र येतात. परिसरात पोलिसांचाही चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# बेलोरा विमानतळावर पहिल्या विमानाने मा.खासदार नवनीत रवी राणा करणार प्रवास

## रेगुलर विमान फेरीचा होणार शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

तत्कालीन खासदार नवनीत रवी राणा यांनी बेलोरा विमानतळ सुरू करण्यासाठी केंद्र सरकारकडे ,राज्य सरकारकडे सातत्याने खूप प्रयत्न केले.



लोकसभा सभागृहात त्यांनी आवाज उचलला त्यांनी यशस्वी प्रयत्न करून बेलोरा विमानतळाची प्रतीक्षा आता संपली आहे .एलाइंस एअर एअँर या कंपनीचे विमान दिनांक १६एप्रिल २०२५रोजी पहिले प्रवासी विमान संख्या९१६३३ मुंबईवरून सकाळी ०९:०० वा.अमरावती बेलोरा विमानतळाकडे झेपावणार आहे. ते अमरावती बेलोरा विमानतळावर सकाळी १०:४५वा. टेक ऑफ होईल.त्या विमानाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उप मुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री सिंधिया ,राज्यमंत्री उइ्डाण, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, यांचे समवेत माजी खासदार नवनीत रवी राणा ह्या सुद्धा पहिला प्रवास करत आहे .बेलोरा विमानतळावर पहिले पाऊल ठेवणार असून या आनंद सणाचा आनंद घेणार.रेगुलर विमान सेवेचा शुभारंभ होणार आहे त्या मध्ये नवनीत रवी राणा सहभागी होतील.

# महाराष्ट्रात दोन दिवसांत अवकाळी पाऊस; अनेक ठिकाणी गारपिटीचा तडाखा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**



मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात कमाल तापमानाचा पारा १ ते २ अंश सेल्सिअसने उतरला आहे. मात्र, विदर्भात उष्णतेची लाट कायम आहे. पुढील एक ते दोन दिवसांत पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे राज्यातील अनेक भागात अवकाळी पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

दरम्यान, अकोला येथे ४२.४ सर्वाधिक तापमान नोंदविले गेले. तर, जळगाव, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यात रविवारी गारासह अवकाळी पाऊस झाला.

पश्चिम मध्य बंगालच्या उपसागरामध्ये सक्रिय असणारा कमी दाबाचा पट्टा निवळला आहे. मात्र, राजस्थानच्या पश्चिमेपासून विदर्भाच्या उत्तरेपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. वाढत्या उष्णतेमुळे बाष्पीभवनाच्या प्रक्रियेलाही वेग आला. त्यामुळे काही भागांत पावसाचा अंदाज आहे.

जळगाव, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक आदी भागांतील कमाल तापमानाचा पारा काहीसा उतरला. सोलापूर अद्यापही ४० अंशाच्या पुढेच आहे. पुढील दोन दिवस नंदुरबार, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड या भागांत पावसाचा अंदाज आहे.

# तूर्तास बेलोरा येथील विमानतळाचे नाव अमरावती विमानतळ हेच राहणार - एमएडीसी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

'अलायन्स एअर'ने निमंत्रणाच्या पत्रात अमरावती विमानतळाचा उल्लेख डॉ. पंजाबराव देशमुख अमरावती विमानतळ असा केल्याने निर्माण झालेल्या गोंधळावर अखेर 'अलायन्स एअर'नेच खुलासा केला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सोमवारी पाठवलेल्या पत्रात चूक सुधारली आहे.अमरावती-मुंबई प्रवासी विमानसेवेचा शुभारंभ बुधवारी १६ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे. मुंबई-अमरावती-मुंबई या विमानसेवेच्या शुभारंभाच्या संदर्भात १० एप्रिल रोजी निमंत्रण पत्र तयार करण्यात आले होते. त्यात अमरावती विमानतळाचे नाव डॉ. पंजाबराव देशमुख विमानतळ असे लिहिले आहे. मात्र विमानतळाचे अचूक नाव अमरावती विमानतळ आहे. डॉ. पंजाबराव देशमुख अमरावती विमानतळ हे नाव 'गुगल सर्च' वरून घेतले आहे पण अधिकृत पत्रव्यवहारात अमरावती विमानतळ असे नाव नमूद करण्यात आले आहे. सुधारित निमंत्रण पत्र तुम्हाला लवकरच पाठवले जाईल. १० एप्रिल २०२५ रोजीचे पूर्वीचे पत्र मागे घेण्यात आले आहे, असे 'अलायन्स एअर'चे चेअरमन अमित कुमार यांनी म्हटले आहे.




'अलायन्स एअर'ने काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे यांना १० एप्रिलला निमंत्रण पत्रिका पाठवली, त्यात विमानसेवेच्या शुभारंभाच्या कार्यक्रमासाठी १६ एप्रिलला सकाळी १०.३० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख अमरावती विमानतळावर उपस्थित रहावे, असा उल्लेख होता. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने मात्र 'अलायन्स एअर'ची ही चूक असल्याचे कालच स्पष्ट केले होते. अद्याप शासन स्तरावर विमानतळाला नाव देण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही. यासंदर्भात अलायन्स एअरला कळविण्यात आल्याचे 'एमएडीसी'चे म्हणणे होते. 'एमएडीसी'च्या उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी देखील शनिवारी विमानतळावर पत्रकारांशी बोलताना अमरावती विमानतळाच्या नामकरणासंदर्भात कुठलाही निर्णय झाला नसल्याचे स्पष्ट केले होते.

खासदार बळवंत वानखडे यांनी गेल्या ३ एप्रिलला लोकसभेत भारताचे माजी कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांना मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्याची मागणी केली, शिवाय बेलोरा विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्याच्या मागणीचा पुनरूच्चार केला होता. त्यानंतर बळवंत वानखडे यांना मिळालेल्या निमंत्रण पत्रिकेत डॉ. पंजाबराव देशमुख यांचा नामोल्लेख असल्याने त्यांनी आनंद व्यक्त केला होता.दुसरीकडे, अमरावती विमानतळाला प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी देखील करण्यात आली आहे. पण, तूर्तास बेलोरा येथील विमानतळाचे नाव अमरावती विमानतळ हेच असल्याचे 'एमएडीसी'ने स्पष्ट केले आहे.